Godavari Foundation's
**DR. ULHAS PATIL MEDICAL COLLEGE & HOSPITAL,**
Recognized by Medical Council of India, Approved by Central Govt. of India, New Delhi,
Letter no. MCI-34(41)/2012-med./158127, dated 05/02/2013
Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik [College Code-1306]
Jalgaon-Bhusawal Road, Jalgaon Kh, Tal. & Dist. Jalgaon 425309
Tel. No. (0257)2366657, 2366678 Fax No. 0257-2366648
Email ID : dupmcj@yahoo.in Web Site : www.dupmc.ac.in

## 7.1.8 Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socio-economic and other diversities:

**Response**:

Dr. Ulhas Patil Medical College and Hospital (Godavari foundation) is one of the premium centres of higher education in Maharashtra aiming at excellence in teaching and extension activity ensuring quality, access, equity and values. The aim of the college is having a very strong vision to train the medical students with empathy and produce quality medical doctors with competent skill. Spread of knowledge how to render good service to society and acquire commanding heights in the field of medical. The values like innovation, knowledge dissemination, cutting edge research, competency building and extension activities with holistic approach are the important and perpetuate them for societal needs. The college believes in inculcating competitive spirit and human values among the students promoting peace and harmony in the society. It contributes to the amelioration of the weaker section in an economically, socially, and educationally developing region of the state of Maharashtra.

**The institutional efforts/initiatives are as follows:**

- All national days are celebrated at college where faculty/non-teaching staff/students gather together at the campus. Cultural activities are performed during the event. Faculty members and students take a pledge to preserve the unity, integrity, and security of the nation. It sensitizes students about the constitution of India, their duties, and responsibilities towards the nation. Programme in charge scheduled various activity which help to increase awareness in students regarding all days.
- The college celebrates religious festivals like Ganesh Festival, Christmas, Eid, etc.
- "SAMANVAY", "AAGAZ" and many more celebrated every year in an annual social gathering by the student as well as staff where everyone comes in traditional attire representing their culture.
- "Godavari pariwar Saptahik" a weekly newspaper gives a platform to the students and faculties to express themselves to fulfill all types of needs of society.
- Staff wear apron and students wear uniform in the campus which shows uniformity and discipline.

- The college provides assistance to the students from reservation category and economically weaker section in obtaining scholarship/freeship from Goverment.
- The economically backward patients are facilitated with several BPL Programmers such as VJAY, MJPJAY, etc.
- Yearly based college brochure publication for common message to all individuals of college

**Location Advantage:**

DUPMC and Hospital has a leverage of its location to serve rural areas as it is having good road connectivity. This allows patients from either of the state to get easy access to this hospital. It lies in rural area hence making it easily available for the rural people. This hospital is built beside to the highway which again makes it easily accessible for emergency cases.

Dean
Dr Ulhas Patil Medical College, Jalgaon.

Dean
Dr.Ulhas Patil Medical College
& Hospital, Jalgaon Kh.

Chairman
Dr Ulhas Patil Medical College, Jalgaon.

PRESIDENT
GODAVARI FOUNDATION
JALGAON.(M.S.)

## संपादकीय

## 'शक्ती' प्रदान

महाराष्ट्राच्या विधिमंडळाने सर्वसंमतीने महिलांवरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी 'शक्ती कायदा' बनविण्यासाठीचे विधेयक मंजूर केले आहे. राज्यपालांच्या संमतीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल आणि महाराष्ट्रातील पोलिस तसेच न्यायव्यवस्था यांच्या हातात महिलांचे संरक्षण करण्यासाठी एक नवे कायदेशीर शस्त्र उपलब्ध होईल. महाराष्ट्र हे आपल्याला आपलेच कौतुक करून घेण्यासाठी 'पुरोगामी राज्य' वाटत असले; तरी वस्तुस्थिती तशी नाही. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचार सातत्याने वाढत आहेतच; पण त्या अत्याचारांची निर्घृणता तसेच प्रकार अंगावर काटा आणणारे आहेत. या नव्या कायद्यात 'अॅसिड हल्ल्यांना बळी पडणाऱ्या महिला' अशी वेगळी वर्गवारी करण्यात आली आहे. मुंबईपासून गोंदियापर्यंत आणि बीडपासून पुण्यापर्यंत सर्वत्र महिलांवर अॅसिडहल्ले होत आहेत. चार वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने अॅसिडहल्ला सोसणाऱ्या महिलांना तात्काळ दहा लाख रुपयांची भरपाई तसेच औषधोपचार देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतही ही विकृती कमी झालेली नाही. अनेक तरुणी भरपाईची रक्कम घ्यायला जिंवतही राहात नाहीत. या पार्श्वभूमीवर नव्या शक्ती कायद्यामध्ये अशा विकृतांना किमान १५ वर्षे ते आजीवन कारावास देण्याची तरतूद आहे. तसेच, हल्लेखोरांना जबर दंड करून त्या रकमेतून पीडित महिलांवर उपचार करण्याचेही कलम नव्या कायद्यात आहे. महाराष्ट्राचा 'शक्ती' हा नवा कायदा पुष्कळसा आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्यासारखाच आहे. मात्र, २०१९ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी अतिशय वेगाने हा कायदा करून घेतला आणि त्या कायद्याखाली आंध्रमध्ये गुन्हेगारांना मृत्युदंडापासून जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षा जलदगती न्यायालयांच्या मार्फत झाल्या आहेत. आंध्रमधील हा वेग कौतुकास्पद आहे. महाराष्ट्रात एकतर हा कायदा होण्यास बराच विलंब झाला आहे. आता तरी राज्य सरकारने तो अमलात आणण्यासाठी आवश्यक असणारी सारी यंत्रणा तातडीने उभारून महिलांना दिलासा देण्याची गरज आहे.

विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात विरोधाभास असला तरी या कायद्यावर एकमत होणे, स्वाभाविक होते. तसे ते झाले. नव्या प्रारूपामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. महिलांचा सध्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून होणारा मानसिक छळही वाढला आहे. या कायद्यात आता डिजिटल माध्यमातून आक्षेपार्ह वर्तन केल्यास कठोर शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, गुन्हा नोंदविला गेल्यापासून तीस दिवसांमध्ये तपास पुरा करावाच लागेल. अपवादात्मक स्थितीत अनुमती घेऊन ही मुदत फक्त एकदाच तीस दिवसांनी वाढविता येईल. पोलिस तपास जर इतक्या वेगाने होणार असेल तर सरकारला त्यासाठी पोलिस दलाची कुमक वाढवावी लागेल. त्याचप्रमाणे, वेगाने होणाऱ्या तपास कामाची तार्किक परिणती गाठायची असेल तर पुढे खटला दाखल होऊन निकालही त्याच वेगाने लागायला हवेत. यासाठी कायद्यात तरतूद असली तरी सरकारने जलदगती न्यायालय तसेच इतर सुविधाही वेगाने निर्माण करायला हव्यात.

याअधिष्ठानाचे परमशांती किंवा ब्रह्मनिर्वाण हे अंतिम स्वरुप आहे. प्राचीन काळापासून




आतापर्यंत अनेक भाष्यकार झाले आहेत. शंकराचार्यपूर्व भाष्यकारांच्या मते ज्ञानकर्म समुच्चय, शंकराचार्यमते निष्काम कर्मजन्य चित्तशुद्धीने निष्पन्न होणारी संन्याससहित ज्ञाननिष्ठा, रामानुज, मध्व, = निंवार्क = ज्ञानेश्वर इ.आचार्यांच्या मते ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करीत साक्षात्काररुप झालेली भक्ति किंवा योगी = अरविंदाच्या मते कर्म, पातंजलयोग, ज्ञान व भक्ति याचा समुच्चय म्हणजे पुर्णयोग. यापैकी कोणते तरी एक गीतातात्पर्य आहे.

कर्म भक्तीशी जुळते, परंतू कर्माची पुर्ण वैराग्यनिष्ठ ज्ञानमार्गाशी तशी सुसंगती निश्चीत करणे कठीण आहे. भगवद्गीतेमध्ये अंतर्विरोधी विधाने पुष्कळ आहेत. भाष्यकार व टीकाकार त्यांच्यात सुसंगती स्थापन्याचा प्रयत्न करतात. एक अत्यंत स्पष्ट अंतर्विरोधी विधान असे ज्याला कर्मात अकर्म दिसते आणि अकर्मात कर्म दिसते तो माणसामधला (खरा) बुध्दिमान होय. तो योगी आणि सर्व कर्तव्ये पार पाडणारा होय (गीता ४-१८). याचा अर्थ शंकराचार्यांनी उलगडून दाखवला आहे. ब्रह्मसाक्षात्कार ज्याला झाला आहे, त्याच्यां दृष्टीने कर्म हे केवळ भास,म्हणून ते अकर्म होय आणि ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला नाही अशा स्वस्थ बसलेल्या मनुष्याच्या ठिकाणी कर्म दिसतेच कारण कर्माची अहंकारादी बीजे त्या मनुष्याच्या ठिकाणी असतातच. सर्व भाष्यकारांच्या मते संपूर्ण गीताशास्त्राचा निःश्रेयस पर्यवसायी सारभूत अर्थ सांगणारा आदेश असा.

मत्कर्मकृन्मत्परमो मदभक्तः संगवर्जितः
सर्वभूतेषु यःस मामेति पांडव
(गीता ११.५५)

**अर्थ :** माझ्याकरता कर्मे करणारा, मीच ज्याचे अंतिम उदिष्ट आहे, माझा भक्त, आसक्तिरहित, प्राणिमात्राबद्दल निर्वेर वृत्तीचा असा जो तो, हे पांडवा, माझ्यापाशी येतो. **(क्रमशः)**



संशोधक व लेखिका

## हॉटेल मॅनेजमेंटतर्फे भुसावळ स्कूल येथे व्याख्यान



**जळगाव** – हरिभाऊ जावळे इन्स्टि. ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अॅन्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजीतर्फे भुसावळ येथील डॉ. उल्हास पाटील सीबीएसई इंग्लिश मीडियम येथे ग्रुमिंग अॅन्ड हायजिन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होत. या प्रसंगी प्र.प्राचार्य पुनित बस्सन, प्रा. रोहित अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले.



चिनावल येथे नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात व्याख्यान

## निरोगी स्वास्थ्यासाठी शस्त्रक्रिया...

**(पान १ वरुन)** दि. १ ते ३० जानेवारी दरम्यान महाशास्त्रक्रिया अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम धनवंतरीचे पूजन डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वाना निरोगी आरोग्य प्रदान करो आणि या अभियानाद्वारे रुग्णाना विकारातून मुक्त होऊ दे अशी प्रार्थना करण्यात आली.




## ऊर्जा संवर्धन • ऊर्जा बचत

### ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व

पारंपारिक ऊर्जा बचत करणे हि ऊर्जा संवर्धनाची पहिली पायरी आहे . गेल्या कित्येक शतकांपासून संपूर्ण विश्वामध्ये मानव अतिशय वेगाने पारंपरिक ऊर्जेचे शोषण करीत आहे परंतु त्या वेगाने पारंपारिक ऊर्जेची निर्मिती होत नाही म्हणून अमूल्य अश्या ऊर्जेचे जतन करण्यासाठी ऊर्जेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. ऊर्जा संवर्धनाने पारंपरिक ऊर्जेच्या वापरावरील खर्च कमी करता येतो. पारंपरिक ऊर्जा खाणींपासून मिळवणे खूप खर्चाचे काम असते म्हणूनच ग्राहकांना उच्च दराने खरेदी करावी लागते. ऊर्जा सर्वधनाने खाणींपासून मिळणाऱ्या इंधनावरील खर्च कमी करता येतो पर्यायाने ग्राहकांना कमी खर्च येतो.ऊर्जा बचत झाल्याने पैशांची बचत होऊन अर्थव्यवस्थेला मजबुती येते . वैज्ञानिक संशोधनात ऊर्जा



संवर्धन हा संशोधकांसाठी चांगला विषय आहे . म्हणूनच संशोधकांनी पारंपरिक उर्जेला पर्याय तसेच नवीन ऊर्जेचे पर्याय समोर आणले आहे . पर्यावरणचे संरक्षण करणे हा ऊर्जा संवर्धनामागील दुसरा उद्देश्य आहे . पर्यावरणचे अतोनात नुकसान हे पारंपरिक इंधनातील काही घटकामुळे होत असते. जसे कोळसा जाळल्यामुळे वातावरण प्रदूषित होते. तसेच किरणोत्सारी पदार्थापसून अतिनील किरणांमुळे वातावरणाचे नुकसान होते म्हणून ऊर्जा संवर्धनाने वातावरणाचे संरक्षण होत असते . वातावरणातील प्रदूषण मानवाच्या श्वासोच्छवास यंत्रणेला घातक ठरते . खराब झालेल्या किरणोत्सारी पदार्थांमुळे मानवास कर्करोग व इतर प्राणघातक आजार होत असतात म्हणूनच ऊर्जा संवर्धन हे वातावरण सरंक्षणातील महत्वाचे पाऊल आहे.

ऊर्जा संवर्धनाच्या उद्देशाने केलेल्या संशोधनामध्ये संशोधकांनी अनेक नवीन ऊर्जे चे स्रोत समोर आणलेले आहेत त्यांनाच आपण अपारंपरिक ऊर्जा म्हणजेच कधीही नष्ट न होणारी ऊर्जा म्हणतो. सौरऊर्जा

सौरऊर्जा आपणास सूर्यापासून विनामूल्य मिळत असते . फोटोव्होल्यटीक सेल असलेले सोलर पॅनल वापरून सूर्यापासून मिळणारी ऊर्जा विदयुत ऊर्जेत रूपांतरित करता येते हि निर्माण झालेली विद्युत ऊर्जा आपण विद्युत ग्रीड सिस्टिम ला जोडू शकतो तसेच बॅटरी मध्ये काहीवेळासाठी साठवू शकतो . ह्या मध्ये एकदाच सोलर पॅनल तसेच

इन्व्हर्टर

खरेदी केल्यानंतर पुन्हा खर्च यत नाही . ह्यात लागणारी सौर ऊर्जा विनामूल्य उपलब्ध होत असते. आज बऱ्याच ठिकाणी रस्तावरचे दिवे तसेच अनेक कार्यालयातील वीज हि सौर ऊर्जे पासून तयार होत असते.

पवनउर्जा – आपण वाऱ्याला कधीही पळवून लावू शकत नाही तसेच थांबवू शकत नाही. वारा पृथ्वीचे परिवलन व परिभ्रमणामुळे तयार होत असतो . अश्या वाऱ्याचा वापर चांगल्या कामाकरिता करण्यात यावा ह्या संकल्पनेतून वाऱ्यापासून विद्युत निर्मिती करता येते . पावनऊर्जेची उभारणी करण्यापूर्वी त्या ठिकाणची वाऱ्याची घनता (wind density) विचारात घेऊन योग्य त्या टरबाइन आणि जनरेटर ची उभारणी केली जाते . पावनऊर्जेपासून पासून तयार केलेली वीज संपूर्ण कुटुंबाची गरज भागवू शकते .तसेच स्थानिक विद्युत ग्रीड ला सुद्धा देता येते. जलविद्युत ऊर्जा

जलविद्युत निर्मितीमध्ये वाहत्या पाण्याचा वापर करून (kinetic energy) वीज निर्मिती केली जाते . ह्या प्रकारचे प्रकल्प नदीवरील धरण तसेच उंचीवरील मोठमोठे जलाशयांच्या ठिकाणी उभारता येतात . ह्या मध्ये अतिशय वेगाने पाण्याचा मारा टरबाइन च्या वॉटर व्हील वर करून वीज निर्मिती केली जाते.

तसेच समुद्री लाटांपासून व जमिनीच्या आतील उष्णता वापरून सुद्धा वीज निर्मिती करता येते . ह्यांना नवीनीकरण ऊर्जा (Renewable Energy) म्हटले जाते._ नवीनीकरण ऊर्जामूळे वातावरणाचे पूर्ण सरंक्षण होते, तसेच मानवाच्या आरोग्यास अपायकारक नाही. मानवतेच्या कल्याणासाठी ऊर्जेचे संवर्धन गरजेचे आहे . वसुंधरेने मानवाच्या गरज पूर्ण करण्याइतकी ऊर्जा दिलेली आहे न कि मानवाच्या हव्यास पूर्ण कारण्यासाठी.

**प्रा. अतुल अ. बऱ्हाटे**
**विद्युत अभियांत्रिकी विभाग**
**गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग,जळगाव**

## मनातला अंधार

हे आपल्याला सर्व कळते परंतु आपण त्याला मदत करण्याऐवजी त्याच गॉसिप करतो, त्याची थट्टा करतो, काहींना तर बरं झालं असं हि वाटतं. मानवी स्वभाव पण जरा विचित्रच आहे. ते समजणे जरा कठीणच आहे. समजा, आपल्यासमोर आपला एखादा मित्र चालतांना घसरून पडला,तरी आपली पहिली रिएक्शन आपल्याला आधी हसू फुटते. मग आपण त्याला उठवण्यासाठी हात देतो. त्याप्रमाणे आपल्याला माणसं हि सोबत दिसत असतात, पण ती एकमेकांच्या मनाला किती जखमी करीत असतात याच भान राहत नाही. भारतीय समाजात मघरफ हे प्रारूप बहुतेक वेळा ऊब कमी देते आणि ऊर्जा अधिक शोषते. फक्त नात्यात गुंते तयार करणे, सोपं जगणं क्लिष्ट करून टाकते. कोणीच कोणाशी बोलत नाही. डिप्लोमसी सुरु असते सगळी. जिथं मी प्रेमात पडले/पडलो हे मुलं आई-वडिलांना सांगू शकत नाही, तिथं आणखी काय संवाद होणार? माझ्याशी भांडायला, खुन्नस द्यायला मी काय भावकी आहे का त्याची? असं गावात सहजपणे बोललं जात. अशा नात्यांचं काय करायचं? आपल्या सारख्या देशात नैतिकता परंपरा संस्कृती याचे खूप धडे गिरवले जातात. मला काहीच नको, मला भौतिक गोष्टींचे आकर्षण नाही असे म्हणायचे आणि प्रत्यक्षात मात्र त्यासाठी एकमेकांचा जीव घ्यायला सज्ज व्हायचे. प्रतिभा, प्रयत्न , चिकाटी याच्या आधारावर प्रगती करण्याची अकांक्षा बाळगण्यात गैर असं काही नाही. पण, त्यासाठी माणसं खोडण्याची,त्यांना दूर करण्याची, भिंती बांधण्याची हि कसली विखारी विकृती? अशा वेळी कोण कोणाशी बोलेल? संवाद कसा होईल?

बबन ठाकरे
समुपदेशक, क्लिनिकल आणि रिहॅबिलिटेशन सायकोलॉजिस्ट
मानसोपचार विभाग

(क्रमशः)

साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
# गोदावरी
परिवार
पोस्ट रजि. नं.-AR/TECHNO.RNP-JAL/120/2012-14
※ वर्ष २३ वे अंक २० ※ ※ सोमवार, दि. १३/०५/२०१९ ※ ※ डाक बुधवार, दि.१५/०५/२०१९ ※ ※ किंमत २ रुपये ※

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जपली सामाजिक बांधीलकी

## प्रसुती झालेल्या महिलेसाठी केले रक्तदान : महिलेची प्रकृती धोक्याबाहेर



जळगाव - येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात प्रसुती झालेल्या महिलेला वेळीच खुद्द महाविद्यालयाच्याच विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जपल्याचा प्रत्यय आज आला.

जळगाव तालुक्यातील बेलव्हाय येथील २८ वर्षीय विवाहीता प्रसुतिसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात गेल्या दोन दिवसापुर्वी दाखल झाली. या महिलेची प्रकृती अत्यंत नाजूक होती. तीच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण अत्यंत कमी होते. अशात तिची प्रसुती झाल्यानंतर हे रक्ताचे प्रमाण अगदी ३.६० पर्यंत आल्याने तीचा जीव धोक्यात आला होता.अशा परीस्थितीत या महिलेल्या कुटूंबियांनी तीच्याकडे दुर्लक्ष केले. मात्र दोन दिवसापासून तीच्या उपचारासाठी कार्यरत असलेल्या डॉ. पाटील रूग्णालयाच्या विद्यार्थ्यांनी या महिलेला रक्तदान करण्याचा निर्णय घेतला. एमबीबीएसच्या द्वितीय वर्षाचे विद्यार्थी मनिष पाटील, प्रतिक जुगूनके, डॉ. प्रशांत पवार, डॉ. दुर्गेश मालवडे, डॉ. पार्थ पटेले डॉ. क्रिष्णा नाईक, गौरव, मेघना पटेल, संजय पाटील, या विद्यार्थी व प्रशिक्षणार्थींनी प्रसुती झालेल्या या महिलेला रक्तदान करून तीचा जिव वाचविला. या रूग्णालयातील केवळ अधिकारी व कर्मचारीच नव्हे तर विद्यार्थी आणि प्रशिणार्थींकडूनही सामाजिक बांधिलकी जपल्याचा प्रत्यय आल्याने त्यांचे माजी खा. डॉ. उल्हास पाटील व रूग्णालय प्रशासनाने कौतुक केले आहे.

# बामणोद येथे आरोग्य व प्रशिक्षण केंद्र

जळगाव - डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातर्फे बामणोद येथे ग्रामीण भागातील जनतेसाठी ग्रामीण आरोग्य व प्रशिक्षण केंद्रात उपचार सुरू करण्यात आले आहे. नुकताच या केंद्राचा शुभारंभ माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला आहे. जिल्ह्यात ग्रामीण भागातील गरजू रूग्णांसाठी उपकेंद्र उघडण्यात आले आहे, परंतु या उपकेंद्राची परिस्थिती लक्षात घेतली असता रूग्णांना उपचाराच्या सुविधा उपलब्ध होण्यास मोठ्या अडचणी येत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजु रूग्णांना चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे पुढाकार घेण्यात आलेला आहे. यावल तालुक्यातील बामणोद येथे ग्रामीण आरोग्य व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या आरोग्य व प्रशिक्षण केंद्रामध्ये डॉ. निलेश बेंडाळे व डॉ. जितेंद्र सुरवाडे या दोन तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बाह्यरूग्ण तपासणी, उपचार व इतर आरोग्य सेवा रोज सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध करून दिल्या जातील. यावल तालुक्यासह पंचक्रोशीतील नागरिकांसाठी हे केंद्र निश्चितपणे लाभदायी ठरेल. तरी ग्रामीण भागातील जास्ती जास्त जनतेने या केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. उल्हास पाटील रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

Godavari Parivar sahptahik – 2019 and 2022

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!

साप्ताहिक

# गोदावरी परिवार

RNI Regd. No. MAHMAR/1999/7490

2022



पोस्ट रजि.न.-AR TECH NO RNP-JAL 120/2019-21

* वर्ष २३ वे * अंक १ * सोमवार ०३/०१/२०२२ * * डाक ०५/०१/२०२२ *



## आरोग्यविषयक गोदावरी दिनदर्शिका २०२२ चे अनावरण

जळगाव – नूतन वर्षानिमित्त गोदावरी फाऊंडेशनतर्फे आरोग्यविषयक गोदावरी दिनदर्शिका २०२२ चे वैद्यकीय महाविद्यालयात ... अनावरण करण्यात आले.

गोदावरी फाऊंडेशनतर्फे नवीन वर्षाच्या या आरोग्यविषयक दिनदर्शिकेत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रुग्णालयातील प्रत्येक विभागाची इत्यंभूत माहिती ...



... यांविषयीच्या माहितीचा समावेश करण्यात आला प्रमुख ... गरजू रुग्ण आणि नागरिकांना संपर्क साधण्यासाठी ... संबंधित विभागाचे ... मोबाईल क्रमांक देखील नमूद करण्यात आले आहे. तसेच रुग्णालयात लागू असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती देखील यात देण्यात आली आहे. ... दिनदर्शिकेचे मोठ्या थाटात अनावरण करण्यात आले.

**यांची होती उपस्थिती**

गोदावरी दिनदर्शिका २०२२ चे अनावरण करताना गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खा. डॉ. उल्हास पाटील, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ... हृदयविकार तज्ञ डॉ. वैभव पाटील, नर्सिंगचे डायरेक्टर शिवानंद बिरादार, ... संकेत पाटील, कीर्ती पाटील, ... विभाग प्रमुख ... पाटील, ... मीडिया विभागातील सहाय्यक जनसंपर्क अधिकारी गौरी जोशी, ... दीक्षा मुळे आदी उपस्थित होते.

नवे वर्ष नवा संकल्प...

## निरोगी स्वास्थ्यासाठी शस्त्रक्रिया अभियानाचा श्रीगणेशा; ५०० पेक्षा अधिक रुग्णांची नोंदणी

जळगाव – ... महाशस्त्रक्रिया अभियान आयोजित केले आहे. शनिवार, १ जानेवारी रोजी या महाशस्त्रक्रिया अभियानाचा श्री गणेशा ... नोंदणी करण्यात आली. यात ... बुलढाणा येथील रुग्णांचा समावेश आहे. ... जानेवारी या पूर्वनियोजित ... गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रुग्णालयातर्फे (पान २ वर)

**गावोगावी कॅम्पद्वारे जनजागृती**

महाशस्त्रक्रिया अभियानासाठी जळगाव, बुलढाणा जिल्ह्यातील ... आयोजन करण्यात आले असून त्याद्वारे अभियानांतर्गत होणाऱ्या मोफत शस्त्रक्रियांची माहिती देण्यात आली. ... आली.



"व्याधीमुक्त समाजाचे स्वप्न

गत २ वर्षांपासून ... कोरोनाचा सामना करत आहे. या संकटातून काही ... असलो तरी इतरही व्याधी आहेतच. गरजू रुग्णांना निःशुल्क उपचाराची सुविधा उपलब्ध करून देऊन ... घटकाचे स्वप्न आहे, त्यासाठी हे अभियान उपयुक्त ठरणार आहे.

डॉ. उल्हास पाटील, अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन

पोटाची सोनोग्राफी केल्याने ... समजते, त्या दृष्टीने प्रोस्टेट, मूत्रखड्याची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली सोनोग्राफी ... आहे, त्याचा रुग्णांनी लाभ घ्यावा.

## अपघातग्रस्तांसाठी गोल्डन अवर्समध्ये गोदावरीत उपचार

जळगाव – रस्त्यावर वा कोठेही अपघात घडल्यास तात्काळ ... अवर्समध्ये डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात ... त्यामुळे अपघातानंतर तात्काळ गोदावरी हॉस्पिटलमध्ये दाखल करताना गोल्डन अवर्समध्ये डॉक्टरांकडून उपचार केले ...

राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झाले असले तरी ... अनेकदा अपघातात जखमींना विविध अवयवांना ... होतात, ...

## निःशुल्क शस्त्रक्रियेंतर्गत ४० हून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया



तसेच नेत्ररोग विभागातर्फे मोतीबिंदूसह काचबिंदू, रेटिना आदि प्रकारच्या ... त्यासाठी गावागावात शिबिर घेतले जात असून रुग्णांनी या अभियानाचा लाभ घ्यावा ...

साप्ताहिक
# गोदावरी परिवार
RNI Regd. No. MAHMAR/1999/7490
वर्ष २३ वे अंक २० सोमवार, दि. १३/०५/२०१९ डाक बुधवार, दि.१५/०५/२०१९ किंमत २ रुपये

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जपली सामाजिक बांधीलकी

## प्रसुती झालेल्या महिलेसाठी केले रक्तदान : महिलेची प्रकृती धोक्याबाहेर



जळगाव - येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात प्रसुती झालेल्या महिलेला वेळीच खुद्द महाविद्यालयाच्याच विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जपल्याचा प्रत्यय आज आला.

जळगाव तालुक्यातील बेलव्हाय येथील २८ वर्षीय विवाहीता प्रसुतिसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात गल्या दोन दिवसापुर्वी दाखल झाली. या महिलेची प्रकृती अत्यंत नाजूक होती. तीच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण अत्यंत कमी होते. अशात तिची प्रसुती झाल्यानंतर हे रक्ताचे प्रमाण अगदी ३.६० पर्यंत आल्याने तीचा जीव धोक्यात आला होता.अशा परीस्थीतीत या महिलेल्या कुटूंबियांनी तीच्याकडे दुर्लक्ष केले. मात्र दोन दिवसापासून तीच्या उपचारासाठी कार्यरत असलेल्या डॉ. पाटील रूग्णालयाच्या विद्यार्थ्यांनी या महिलेला रक्तदान करण्याचा निर्णय घेतला. एमबीबीएसच्या द्वितीय वर्षाच विद्यार्थी मनिष पाटील, प्रतिक जुगूनके, डॉ. प्रशांत पवार, डॉ. दुर्गेश मालवडे, डॉ. पार्थ पटेल डॉ. क्रिष्णा नाईक, गौरव, मेघना पटेल, संजय पाटील, या विद्यार्थी व प्रशिक्षणार्थीनी प्रसुती झालेल्या या महिलला रक्तदान करून तीचा जिव वाचविला. या रूग्णालयातील केवळ अधिकारी व कर्मचारीच नव्हे तर विद्यार्थी आणि प्रशिणार्थीकडूनही सामाजिक बांधिलकी जपल्याचा प्रत्यय आल्याने त्यांचे माजी खा. डॉ. उल्हास पाटील व रूग्णालय प्रशासनाने कौतुक केले आहे.

# बामणोद येथे आरोग्य व प्रशिक्षण केंद्र

जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातर्फे बामणोद येथे ग्रामीण भागातील जनतेसाठी ग्रामीण आरोग्य व प्रशिक्षण केंद्रात उपचार सुरू करण्यात आले आहे. नुकताच या केंद्राचा शुभारंभ मोठ्या अडचणी येत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू रूग्णांना चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व आली आहे. तसेच बाह्यरूग्ण तपासणी, उपचार व इतर आरोग्य सेवा रोज सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध करून दिल्या जातील. यावल तालुक्यासह पंचक्रोशीतील